आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

१ नोव्हेंबर २०२४ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- राज्यात शंभरी पार केलेल्या मतदारांची संख्या ४७ हजाराच्या वर

- रेल्वे तिकीट आरक्षणाचे नवीन नियम आजपासून लागू

- आज लक्ष्मीपूजन, शेअर बाजारात होणार मुहूर्ताचे सौदे

**आणि**

- प्रधानमंत्र्यांच्या आर्थिक सल्लागार मंडळाचे अध्यक्ष डॉ बिबेक देबरॉय यांचं निधन

**<><><><><>**

राज्यात येत्या २० तारखेला होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत एकूण ९ कोटी ७० लाख २५ हजार ११९ मतदारांना मतदानाचा हक्क बजावता येईल. यामध्ये १८ ते १९ वयोगटातले एकूण २२ लाख २२ हजार ७०४, तर वयाची शंभर वर्षे पूर्ण झालेले ४७ हजार ३९२ मतदार आहेत. मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं ही माहिती दिली.

राज्यातल्या एकूण मतदारांमध्ये ५ कोटी २२ हजार ७३९ पुरुष, ४ कोटी ६९ लाख ९६ हजार २७९ महिला, तर ६ हजार १०१ तृतीयपंथी मतदार आहेत.

राज्यात मतदानासाठी एकूण १ लाख १८६ मतदान केंद्रं उभारली जाणार आहेत. यापैकी शहरी भागात ४२ हजार ६०४, तर ग्रामीण भागात ५७ हजार ५८२ केंद्रं असतील.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीच्या तयारीच्या कामांना राज्यात वेग आला आहे.

**पालघर** जिल्ह्यातल्या डहाणू या अनुसूचित जमातींसाठी राखीव मतदारसंघासाठी निवडणूक निरीक्षक म्हणून अजय कटेसरिया यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

**यवतमाळ** जिल्ह्यात सर्व सातही विधानसभा मतदारसंघात विधानसभा निवडणूक नि:पक्षपाती, निर्भय आणि शांततेच्या वातावरणात पार पाडण्यासाठी राजकीय पक्षांनी आयोगास सहकार्य करावं, असं आवाहन निवडणूक निरीक्षकांनी राजकीय पक्षांना केलं आहे. यवतमाळमधे महसूल भवन इथं निरिक्षकांनी राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींशी संवाद साधला.

याच वेळी जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व निरिक्षकांना जिल्ह्याची माहिती तसेच निवडणूक विषयक तयारीची माहिती दिली. त्यानंतर निरिक्षकांनी निवडणूक विषयक कामकाजाचा सर्व जिल्हास्तरीय नोडल अधिकाऱ्यांकडून आढावा घेतला. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र, मनुष्यबळ, वाहन व्यवस्था, पोस्टल बॅलेट, साहित्य वाटप, कर्मचारी, अधिकाऱ्यांचं प्रशिक्षण, मतदार जनजागृती आदींचा त्यांनी आढावा घेतला.

**<><><><><>**

पुणे जिल्ह्यात विधानसभा निवडणुक आचारसंहितेची अंमलबजावणी सुरू असून, जिल्हा प्रशासनाने नेमलेल्या स्थिर आणि भरारी पथकांनी तसंच उत्पादन शुल्क विभाग आणि पोलिसांनी आतापर्यंत १४ कोटी ५७ लाख रुपये मूल्याचा

मुद्देमाल जप्त केला आहे. त्यात ९ कोटींची रोख रक्कम, १ कोटी ८२ लाख रुपये मूल्याच्या मद्याचा समावेश आहे. सुमारे २३ लाख रुपये किमतीचे अमली पदार्थ आढळले असून सुमारे १८ लाख १२ हजार रुपये किंमतीची चांदी जप्त करण्यात आली आहे.

व्यतिरिक्त आचारसंहिता भंगाच्या ४८९ तक्रारीही नोंदविण्यात आल्याची माहिती जिल्हा प्रशासनातर्फे देण्यात आली.

खेडशिवापूर, खेड आळंदी, मावळ, हडपसर, शिरूर, दौंड, भोसरी, चिंचवड, जुन्नर, कोथरूड,कसबा पेठ, पुरंदर, शिवाजीनगर,  आणि वडगाव शेरी, या मतदारसंघांमधे विविध ठिकाणी ही कारवाई करण्यात आली.

**<><><><><>**

निवडणुकीच्या प्रचारासाठी सर्वच राजकीय पक्ष मोर्चेबांधणी करत असून बड्या नेत्यांच्या सभा राज्यात विविध ठिकाणी होणार आहेत. सोलापूर जिल्ह्यात माळशिरस, अक्कलकोट, दक्षिण सोलापूर, सोलापूर शहर उत्तर, शहर मध्य आणि पंढरपूर-मंगळवेढा या सहा विधानसभा मतदारसंघात भाजप उमेदवारांच्या प्रचारासाठी ५ नोव्हेंबरनंतर भाजप नेत्यांच्या जाहीर सभा होणार आहेत. उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, हैदराबादच्या माधवी लता यांच्या जाहीर सभा सोलापूर शहरात होणार आहेत. याशिवाय पंढरपूर-मंगळवेढा, माळशिरस या मतदारसंघासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची सभा नियोजित आहे.

**<><><><><>**

शिवसेना शिंदे गटाचे मुंबईतले माहीमचे उमेदवार सदा सरवणकर यांनी, आपण निवडणूक लढवण्यावर ठाम असून कदापि माघार घेणार नाही, असं आज पुन्हा म्हटलं आहे. ते आज पत्रकारांशी बोलत होते. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांचे पुत्र अमित ठाकरे यांनी माहीम मतदारसंघातून उमेदवारी अर्ज भरला असून, भारतीय जनता पक्षानं त्यांना पाठिंबा दिला आहे. यासंदर्भात वर्षा या शासकीय निवासस्थानी जाऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेण्याचा आपण प्रयत्न केला, मात्र त्यांची  भेट होऊ शकली नाही, असं सरवणकर यांनी सांगितलं.

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज **नांदेड** जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

रेल्वे तिकीट आरक्षणाचे नवीन नियम आजपासून लागू झाले आहेत. रेल्वेनं याआधी असलेल्या १२० दिवसांच्या आरक्षण कालावधीत कपात करून तो ६० दिवसांवर आणला आहे.  मात्र, ३१ ऑक्टोबरपर्यंत झालेली आरक्षणं कायम राहतील अशी माहिती रेल्वेनं दिली आहे. ६० दिवसांच्या आरक्षण कालावधीमुळे तिकिटांच्या उपलब्धतेच्या शक्यता वाढून त्याचा प्रवाशांना थेट लाभ मिळेल असं

रेल्वे प्रशासनानं म्हटलं आहे. ६१ दिवस ते १२० दिवसांच्या कालावधीसाठी केलेलं तिकीट आरक्षण प्रवाशांकडून रद्द करायचं प्रमाण २१ टक्के एवढं होतं अशी माहिती रेल्वेनं दिली आहे.

**<><><><>**

दीपावलीच्या प्रकाश पर्वानिमित्त राज्यात सर्वत्र उत्साहाचं वातावरण आहे. घरोघरी आकाश कंदील, पणत्या, विजेच्या दिव्यांची आकर्षक रोषणाई, रांगोळ्या, या बरोबरीनं आप्तजनांच्या भेटीगाठी, फराळाच्या पदार्थांची मेजवानी असं चैतन्याचं वातावरण आहे. राज्यात आज संध्याकाळी लक्ष्मी पूजन होणार असून त्यासाठी झेंडूच्या फुलांनी आणि तोरणांनी बाजरपेठा सजल्या आहेत. दिवाळी निमित्त अनेक सामाजिक सांस्कृतिक उपक्रमांचं आयोजनही ठिकठिकाणी केलं जात आहे. पुणे मुंबईसह सर्वच शहरात दिवाळी पहाट कार्यक्रमांची रेलचेल आहे. अनेक सामाजिक संस्थांमार्फत अन्नदान, वस्त्रदान असे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.
अनेक ठिकाणी रंगावली प्रदर्शनंही भरली आहेत.

**<><><><>**

मुंबईत राष्ट्रीय शेअर बाजार आणि मुंबई शेअर बाजारात आज लक्ष्मीपूजना निमित्त सुट्टी आहे. मात्र व्यापाऱ्यांचं नव वर्ष विक्रम संवत २०८१ च्या प्रारंभानिमित्त आज मुहूर्ताचे सौदे होतील. आज संध्याकाळी पावणे सहा ते सहा या दरम्यान आरंभपूर्व तर संध्याकाळी सहा ते सात या वेळेत मुहूर्ताची सत्र होतील.

**<><><><>**

ठाणे गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलिस आयुक्त शेखर बागडे आणि राबोडी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक हेमंत पाटील यांना केंद्रीय गृहमंत्रालयाचं केंद्रीय गृहमंत्री दक्षता पदक जाहीर झालं आहे. डोंबिवलीतल्या मानपाडा पोलिस ठाण्यात दाखल झालेल्या अपहरण प्रकरणावर अत्यंत कमी वेळात केलेल्या यशस्वी कारवाईबाबत बागडे यांना तर जुलै २०२३ मध्ये पुण्याच्या कोंढवा पोलिस ठाण्यात कार्यरत असताना मोठा दहशतवादी हल्ल्याचा कट उघडकीस आणल्याबद्दल पाटील यांना पदक देऊन गौरवण्यात येणार आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्र्यांच्या आर्थिक सल्लागार मंडळाचे अध्यक्ष डॉ बिबेक देबरॉय यांचं काल नवी दिल्ली इथं निधन झालं. ते एकोणसत्तर वर्षांचे होते. प्रकृती अस्वास्थ्यामुळं कालच त्यांना दिल्लीच्या एम्स रुग्णालयात भर्ती केलं होतं. देबरॉय पूर्वी नीती आयोगाचे सदस्य होते तसंच अर्थमंत्रालयाच्या पायाभूत सुविधा आणि वित्तपुरवठा विषयक तज्ञ समितीचे अध्यक्ष होते. २०१५ मधे त्यांना पद्मश्रीने सन्मानित करण्यात आलं होतं. पुण्यातल्या गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्सचे ते काही काळ कुलपती होते.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी बिबेक देबरॉय यांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. देबरॉय थोर विचारवंत आणि अभ्यासक होते. तसंच युवकांच्या दृष्टीकोनातून त्यांनी भारतीय संस्कृतीचं आकलन मांडलं होतं, असं प्रधानमंत्र्यांनी शोकसंदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातल्या कसोटी क्रिकेट मालिकेतला तिसरा आणि अखेरचा सामना आजपासून मुंबईत वानखेडे मैदानात सुरु झाला. या सामन्यात नाणेफेक जिंकून न्यझीलंडनं पहिली फलंदाजी करायचा निर्णय घेतला. सकाळच्या पहिल्या सत्रात भारतानं न्यूझीलंडच्या सलामीवीरांसह ३ गडी बाद केले. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा पहिल्या डावात न्यूझीलंडच्या ८ बाद २१८ धावा झाल्या होत्या.

या मालिकेतले पहिले दोन्ही सामने जिंकून न्यूझीलंडनं २-० अशी आघाडी घेतली आहे.

**<><><><><>**

आय पी एल अर्थात इंडियन प्रीमियर लीगच्या येत्या २०२५ हंगामासाठी पुन्हा एकदा हार्दिक पांड्याची मुंबई इंडियन्स संघाच्या कर्णधारपदी नियुक्ती झाली आहे. २०२४ च्या आय पी एल हंगामासाठी रोहित शर्माच्या जागी त्याला कर्णधारपद दिलं होतं. याआधीही मुंबई इंडियन्सचं प्रतिनिधित्व केलेल्या हार्दिकनं मधल्या काळात गुजरात टायटन्सचा कर्णधार म्हणूनही प्रभावी कामगिरी केली होती. तर रोहित शर्माच्या नेतृत्वात मुंबई इंडियन्सनं पाच वेळा आय पी एल चं विजेतेपद पटकावलं आहे.

**<><><><><>**

मराठवाड्यात आज तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता प्रादेशिक हवामान विभागानं वर्तवली आहे. त्यानंतर हवामान कोरडं राहील, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

दरम्यान, **रत्नागिरी** जिल्ह्यात काल संध्याकाळी, तर सांगली जिल्ह्यातल्या मिरज, तासगाव, कवठे महांकाळ, आटपाडी आणि पलूस तालुक्यांमध्ये अनेक ठिकाणी आज सकाळी मेघगर्जनेसह जोरदार पाऊस झाला. या पावसामुळे शेतकऱ्यांसह व्यापाऱ्यांनाही बाजारपेठेवर विपरीत परिणाम होऊ शकतो अशी चिंता निर्माण झाली आहे.

**//<><><><><>//**